सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४७०/४३१/४११,
ई-मेल–desk11@dtemaharashtra.gov.in,वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्रमांक :- ११/तंशिसं/दरपत्रक/एएमसी-एसी/२४-२५/ ९०
दिनांक :- 31 MAY 2024

प्रति,

१. नोटीस बोर्ड, कार्यासन क्र.११, मुख्य कार्यालय, मुंबई
२. संकेतस्थळ, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई
३. ______________________________

विषय :- **संचालनालयातील वातानुकुलित यंत्राकरीता वार्षिक देखभाल व दुरुस्ती करण्यासाठी बंद लखोटयात दरपत्रके मागविण्याबाबत....**

या संचालनालयातील कार्यालयातील व मंत्रालयातील अधिका-यांच्या दालनांमधील अंदाजे एकूण २९ वातानुकूलित यंत्रांच्या अंतर्गत देखभाल व दुरूस्तीबाबत वार्षिक दर निश्चित करण्यासाठी बंद लखोटयात दरपत्रके मागविण्यात येत आहेत. दरपत्रके दि.१०/०६/२०२४ पर्यंत कार्यासन क्र.११ मध्ये ठेवलेल्या पेटीमध्ये दु. १.०० वाजेपर्यंत सादर करावयाची आहेत. प्राप्त झालेली दरपत्रके दि.१० / ०६ /२०२४ रोजी दु. ३.०० वाजता उघडण्यात येतील. उशिरा आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

## अटी व शर्ती

१. दरपत्रके सोबतच्या नमुन्यात (form) मध्येच निविदा/दरपत्रके सादर करावीत. स्वत:चा नमूना वापरू नये. मात्र स्वत:च्या कार्यालयीन लेटरहेड सह या कार्यालयाने दिलेला विहीत नमूना सादर करता येईल. तसेच ***दरपत्रके इ-मेल व्दारे सादर करु नयेत.***

२. तांत्रिक लिफाफा,व्यापारी दरांचा लिफाफा असे स्वतंत्र दोन लिफाफे तिस-या लिफाफयात भरून सादर करावेत.

३. दरपत्रकाच्या किंमती व अन्य संदर्भाचा वैधता कालावधी स्पष्टपणे नमूद केला पाहिजे. दरपत्रके निविदा उघडण्याच्या तारखेपासून ९० दिवसापर्यंतचे असावे.

४. काम समाधानकारकरित्या पूर्ण केल्यानंतरच देयके अदा केली जातील.

५. सदर दर पुरवठा आदेश दिल्याच्या दिनांकापासून २ वर्ष कालावधीकरीता स्थिर असावेत व ते २ वर्ष कंत्राट कालावधीमध्ये संबंधित पुरवठादारास बंधनकारक असतील. सदर २ वर्षाच्या कालावधीत पुरवठादाराचे काम समाधानकारक आढळून आल्यास,पुढील ०३ महिन्याच्या कालावधीकरीता कंत्राट वाढवून देण्यात येईल.

६. <u>तांत्रिक बाबींचा लिफाफा -</u>

- सेवा पुरवठादाराचे फर्मचे नाव ,पुर्ण पत्ता, ईमेल, संपर्कासाठी दूरध्वनी क्रमांक
- जीएसटी नोंदणी क्रमांक
- पॅन क्रमांक
- मूळ उत्पादक कंपनीचे प्राधिकारपत्र (असल्यास)
- यापुर्वी शासकीय/निमशासकीय कार्यालयातील सेवा विषयक कामाचा अनुभव/याबाबतची कागदपत्रे/प्रमाणपत्रे (कार्य आदेश प्रती)/ काम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र
- यापुर्वी कोणत्याही शासकीय/निमशासकीय आस्थापनेने काळया यादीत टाकले नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र

७. <u>व्यापारी दरांचा लिफाफा :- यामध्ये सोबत जोडलेल्या विहित नमुन्यानुसार माहिती भरावी.</u>

८. कोणतेही कारण न देता एक किंवा अनेक निविदा नाकारण्याचा हक्क हे कार्यालय राखून ठेवीत आहे.

( डॉ. विनोद म. मोहितकर)
संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य.,मुंबई.

# वातानुकूलित यंत्राकरीता अंतर्गत देखभाल व दुरूस्तीबाबत दरपत्रकाचा विहित नमुना

१) कंत्राटदाराचे नाव व पत्रव्यवहाराचा पत्ता :- ______________________________
____________________________________________________________
____________________________________________________

२) दूरध्वनी / मोबाईल क्रमांक :- ______________________________________

३) इन्कमटॅक्स पॅन नंबर (झेरॉक्स जोडावी) :- ______________________________

४) उदयोग आधार / मुंबई महानगरपालिका नोंदणी क्रमांक (झेरॉक्स जोडावी): -__________
____________________________________________________________

५) जीएसटी नंबर : - ____________________________________________

| | | |
|---|---|---|
| 1 | General Servicing Including Replacement & Repairing of following Items.<br>a) Capacitors R/ S,<br>b) Fan Capacitor<br>c) Relay & Contactor,<br>d) Conductor Switch,<br>e) Gas Charging,<br>f) 4 No's Services (Quaterly Service)<br>g) Water wash Service<br>h) Blower Service | |
| | | |
| 2. | Compressor Replacement | |
| 3. | Remote Control& Hand Set Replacement | |
| 4. | Indoor unit Fan Motor Replacement. | |
| 5. | Outdoor Unit Fan Motor Replacement. | |
| 6. | Indoor Unit Cooiling Coil Replacement. | |
| 7. | Outdoor Unit Copper Condenser Replacement | |
| 8. | Cooper Pipe- Supply and Installation | |
| 9. | Electrical Power Plug & Switch- Supply and Installation | |
| 10. | Electric Cable-Per Meter- Supply and Installation | |
| 11. | Outdoor Fan Blade Replacement | |
| 12. | Service Valve | |
| 13. | AC Main P.C.B Circuit Repairing. | |
| 14. | Installation Charges | |
| 15. | Dismantle Charges | |
| 16. | Copper Wiring – per meter | |
| 17. | Electrical Cable-per meter- Supply and Installation | |
| 18. | Gas Charging | |
| 19. | Drain Pipe – per meter | |
| 20. | " L " bracket stand for AC ourdoor unit | |

# प्रतिज्ञापत्र

मी खालील सही करणार, याद्वारे घोषित करतो की, या दरपत्रकासाठी तंत्रशिक्षण संचालनालय यांनी विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती वाचल्या असून त्या मला मान्य आहेत. मी या दरपत्रकासोबत दिलेली सर्व माहिती खरी असून, सोबत जोडलेली सर्व कागदपत्रे मूळ प्रमाणपत्रांच्या / कागदपत्रांच्या सत्य प्रति आहेत. मला / मी प्रतिनिधीत्व करीत असलेल्या संस्थेस गोपनीय कागदपत्रे हाताळण्याचा अनुभव असून मी दिलेली सर्व माहिती /सोबत जोडलेली कागदपत्रे खोटी असल्याचे आढळून आल्यास त्याबद्दल माझ्यावर कायदेशीर कार्यवाही होऊ शकते याची मला पूर्ण जाणीव आहे व याबद्दलची सर्वस्वी जबाबदारी माझी राहील.

सही :- ____________________

नांव :- ____________________